


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३५ ■ सोमवार ७ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुगणांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार **दि.७ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.** संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

## बलुचिस्तानात लिबरेश आर्मीचा पाकिस्तानी लष्करावर हल्ला पंचवीस जवान मारल्याचा दावा, हल्ल्याचा व्हिडिओ प्रसिद्ध

**इस्लामाबाद, दि.६- पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्करावर दोन वेगवेगळे हल्ले केल्याचा दावा केला आहे. या दोन्ही हल्ल्यांत मिळून २५ पाकिस्तानी लष्करी जवान ठार झाल्याचे ने म्हटले आहे. मात्र, या दाव्याला पाकिस्तानी लष्कराकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीच्या अधिकृत माध्यम हक्कलने या कारवाईशी संबंधित एक व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये जळालेली लष्करी वाहने आणि घटनास्थळी सशस्त्र बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने लढवय्ये दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या व्हिडिओध्ये मृतदेहही दिसत असल्याचे वृत्त आहे.**

लष्करावर हल्ला करीत १८ जवान ठार केल्याचा दावा बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या फतेह स्क्वॉडने झियारत क्रॉस परिसरात पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर हल्ला केला. या हल्ल्यात लष्कराची २ वाहने नष्ट झाली असून १८ जवान ठार झाल्याचा दावा संघटनेने केला आहे. याशिवाय पळून जाण्यात यशस्वी झालेल्या ५ जवानांना दुखापत झाल्याचेही ने म्हटले आहे. हल्ल्यानंतरच्या दृष्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्यात आला. त्यामध्ये लष्करी वाहनांना आग लागलेली दिसत असून, दुसऱ्या एका दृष्यात लढवय्ये खराब झालेल्या वाहनातून शस्त्रे बाहेर काढताना दिसत असल्याचे सांगण्यात येत आहे.

**दुसऱ्या हल्ल्यात सात जवान ठार**

सुरब मधील हाजिका




परिसरात झालेल्या दुसऱ्या हल्ल्याची जबाबदारीही बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने स्वीकारली आहे. संघटनेच्या दाव्यानुसार, त्यांच्या स्पेशल टॅक्टिकल ऑपरेशन्स स्क्वॉडने रिमोट-कंट्रोल वाहनाचा वापर करून स्फोट घडवून आणला. या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराचे ७ जवान ठार झाल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, (पान ४ वर)

## मध्यप्रदेशात विषारी दारूचे अकरा बळी

सागर, दि. ६ : मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यात विषारी दारूच्या सेवनामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी यापैकी १० मृत्यूंची पुष्टी केली आहे. या घटनेत सुमारे ३५ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. ही घटना सागर जिल्ह्यातील बांदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नौरोजा आणि घुघरा खुर्द या दोन गावांमध्ये घडली. घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली आहे. बाधित गावांमध्ये प्रशासनाकडून तपासणी सुरू असून, दारूचे सेवन केलेल्या व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्यात येत आहे. लक्षणे आढळणाऱ्या व्यक्तींना बुंदेलखंड मेडिकल (पान ४ वर)

## आमदाराच्या सतर्कतेमुळे युवकाचे वाचले प्राण तापी नदी पुलावरुन उडी घेण्यापुर्वीच पकडले

**नंदुरबार, दि. ६ (प्रतिनिधी) - तापी नदीच्या पूलावरुन उडी घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका युवकाला आमदार राजेश पाडवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे वाचविण्यात यश आले आहे. या युवकाला वेळेवर पुलावरुन उडी मारण्यापासून रोखून त्याच्याशी संवाद साधत आ. राजेश पाडवी यांनी त्यास मानसिक धीर देत युवकला सुरक्षितपणे कुटुंबियांच्या स्वाधीन केले. आ. राजेश पाडवी यांनी आपल्यातील तत्परता, संवेदनशीलता आणि माणूसकीचे दर्शन घडविले आहे.**

तळोदा तालुक्यातील न्युबन येथील मनीष रमेश पाडवी (वय २४) हा युवक वैयक्तिक कारणामुळे मानसिक तणावात असल्याचे समजते.



तो प्रकाशा येथील तापी नदीच्या पुलावर आला होता. त्याने आपली मोटारसायकल पुलाच्या कडेला उभी केली होती. त्यानंतर तो पुलाच्या कठड्याजवळ जाऊन उभा राहिला होता. यावेळी आ. राजेश पाडवी हे प्रा. मकरंद पाटील यांच्यासोबत नंदुरबारकडे जात असताना पुलाच्याकडेला एक मोटारसायकल उभी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याचवेळी पुलावर संशयास्पद परिस्थिती असल्याचे लक्षात येताच एका अज्ञात इसमानेही सतर्कता दाखवत परिस्थितीकडे लक्ष वेधले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आ. पाडवी यांनी तात्काळ वाहन थांबवून पाहणी केली. यावेळी मनीष हा पुलाच्या कठडयाजवळ असल्याचे दिसून आले. परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात येताच आ. राजेश पाडवी, अंगरक्षक मुकेश पावरा, प्रा. मकरंद पाटील यांचे चालक प्रभाकर यांनी कोणताही विलंब न करता युवकाच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी मनीषला पकडून (पान ४ वर)

## सूर्योदय फाउंडेशनतर्फे चारशे गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन महिलांनी कौशल्याच्या आधारे आत्मनिर्भर व्हावे : आ. अग्रवाल

**धुळे, दि.६- महिलांना केवळ आर्थिक मदत देण्यापेक्षा त्यांच्या हाताला कौशल्य देऊन त्यांना स्वावलंबी बनविणे ही काळाची गरज आहे. शिलाई मशीनच्या माध्यमातून महिलांनी घरबसल्या व्यवसाय सुरू करून स्वतःच्या उत्पन्नाचा मार्ग निर्माण करावा. मेहनत, कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आर्थिकदृष्ट्या सक्षम होत महिलांनी कुटुंबाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी केले.**



सूर्योदय फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्रातील पहिल्या उपक्रमासाठी धुळे जिल्ह्याची निवड करून धुळे ग्रामीण भागातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना मोफत शिलाई मशीनचे वितरण करण्यात आले. हिरे भवन येथे आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अनुप अग्रवाल, धुळे शहराच्या महापौर सौ. मायादेवी महादेव परदेशी तसेच माजी उपमहापौर तथा नगरसेविका सौ. कल्याणी अंपळकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष आकाश परदेशी, भाजपाचे कोषाध्यक्ष राम अग्रवाल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महादेव परदेशी (पान ४ वर)

## सासरी जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

धुळे, दि. ६ : सासरच्या जाचाला कंटाळून कापडणे (ता. धुळे) येथील विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. अनिता विठ्ठल माळी (वय ३३) हिचा सासरच्या मंडळींनी शारीरिक, मानसिक छळ केला. पती विठ्ठल पंढरीनाथ माळी नेहमी दारु पिवुन शिवीगाळ, मारहाण करून ठार मारण्याची धमकी देत होता. पतीच्या त्रासाला कंटाळून अनिता माळी हीने घरात छताला साडीने गळफास बांधून आत्महत्या केली. पाच सप्टेंबरला दुपारी घटना उघडकीस आली. तिस ग्रामीण रुग्णालय, सोनगीर येथे दाखल केले. वैदकीय अधिकारीयांनी (पान ४ वर)

## पतसंस्था ग्रामीण जनतेच्या अर्थव्यवस्थेची गरज पतसंस्थेच्या फेडरेशनसमोर शहांचे मार्गदर्शन

**धुळे, दि.६- नागरी व ग्रामीण क्षेत्रात शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य नागरीकांना पतसंस्थां अर्थ पुरवठा करत असते. म्हणून पतसंस्था ग्रामीण जनतेतील अर्थव्यवस्थेची गरज आहे . त्यातून नागरीकांचा आर्थिक विकास होत आहे. हेच सहकार क्षेत्राचे उत्तम यश आहे. पतसंस्थांचे थकीत वसूलीसाठी संचालक मंडळ, कर्मचारी यांच्या समन्वयांतून करावे त्यासाठी जिल्हा पतसंस्था फेडरेशन मार्गदर्शकाची भूमिका घेत आहे. असे प्रतिपादन आपल्या अध्यक्षीय भाषणात लक्ष्मीकांत शहा यांनी धुळे जि. फेडरेशन आयोजित प्रशिक्षण शिबिर प्रसंगी बोलतांना व्यक्त केले.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी फेडरेशनचे संस्थापक ड झेड् बी पाटील, सहकार महर्षी विखे पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फेडरेशनचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शहा , फेडरेशनचे गटनेते गोपाळराव केले, यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी राज्य फेडशन नाशिक विभागीय उपाध्यक्ष गोपाळराव पाटील , उपाध्यक्ष (पान ४ वर)

## वर्गणीच्या नावाखाली खंडणीची वसुली

शिरपूर दि.६ (का.प्र.): हार्डवेअर दुकानदाराकडे पाच हजार रुपयांची देणगी मागून कटर व कोयत्याचा धाक दाखवून साडेपाच हजार रुपयांची जबरी चोरी केल्याच्या संशयावरुन एकाविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सचिन भटू सोनार (वय ३९ वर्ष, रा.शिवपार्वती कॉलनी, शिरपूर) यांनी शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, पाच सप्टेंबरला दुपारी साडेबाराला संशयित भटू तुकाराम कोळी (रा. वाल्मिक नगर, शिरपूर) त्याच्याकडे राम हार्डवेअर या दुकानात गेला. करवंद नाका येथील एसडीएम फाऊंडेशनच्या गणेशोत्सवासाठी पाच हजार रुपयांची देणगी पावती द्यावी लागेल (पान ४ वर)

## पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी मुंबई गुन्हे शाखेचे पथक नंदुरबारात

**नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक चौथ्यांदा नंदुरबारमध्ये दाखल झाले. पथकाने नंदुरबार तालुक्यातील खोंडामळी गावात जाऊन कौटिल्य अकॅडमीचे संचालक तथा या प्रकरणातील आरोपी प्रवीण पाटील यांच्या घराची झाडाझडती घेतली.**

या कारवाईदरम्यान पाटील यांच्या मालमत्ता व आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यात आल्याची माहिती आहे. तसेच घरातील विविध कागदपत्रे, महत्त्वाची कागदपत्रे व इतर साहित्याची चौकशी करण्यात आली.

औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाचा तपास सध्या मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरू असून, तपासाच्या अनुषंगाने पथकाकडून नंदुरबारमध्ये यापूर्वीही विविध ठिकाणी चौकशी व तपास करण्यात आला आहे. प्रवीण पाटील यांच्या घराची चौथ्यांदा झाडाझडती घेतल्याने तपासाला महत्त्वाची दिशा मिळण्याची (पान ४ वर)

## काँग्रेसचे रमेश श्रीखंडे यांच्या मुलाचे निधन

धुळे, दि.६- कांग्रेस सरचिटणीस व भटक्या विमुक्त जातीचे अध्यक्ष जेष्ठ नेते रमेश श्रीखंडे यांच्या जेष्ठ चिरंजीव दिपक हे वयाचे ५२ व्या वर्षी अल्पशा आजाराने नासिक येथे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा धुळे येथे रहात्या घरून आज संध्याकाळी रविवारी -वाजता निघून कुमार नगर अमरधाम मध्ये अंत्यविधी होणार आहे. भगवान मृत आत्म्याला चिरशांती देवो हीच प्रार्थना

## सावळदे येथे ग्रा.प शिपायाला मारहाण

शिरपूर दि.६ (का.प्र.): तालुक्यातील सावळदे येथील बस स्टँडजवळ ग्रामपंचायत शिपायाला चाकू व लोखंडी कड्याने मारहाण झाल्याची घटना (पान ४ वर)

## अक्कलकुवा बसस्थानक परिसरात विदेशी दारू जप्त ; एक जण ताब्यात

**अक्कलकुवा, दि.६ (प्रतिनिधी)- येथील पोलीस ठाणे हद्दीतील बसस्थानक परिसरात विदेशी दारूची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अक्कलकुवा पोलिसांनी कारवाई केली.**

या कारवाई दरम्यान अक्कलकुवा बसस्थानक परिसरात दोन पांढऱ्या रंगाच्या कापडी झोळ्यांमध्ये विदेशी मद्य बाळगून असलेला इसम संतोष अर्जुन गुमाने, रा.कंजरवाडा, ता.जि. नंदुरबार यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून विविध ब्रँडची विदेशी दारूच्या एकूण ३६ काचेच्या बाटल्या, एकूण किंमत छ८२,८५०/- असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर मद्याचा माल विजय पंडीत पाटील, रा. गोंधळी गल्ली, नंदुरबार व जितेंद्र उर्फ चिकु दिलीप दावाणी (सिंधी), रा. सिंधी कॉलनी, नंदुरबार यांच्या असल्याचे आरोपीने सांगितले असून, सदर मद्य नंदुरबार येथून अक्कलकुवा मार्गे गुजरात राज्यातील डेडीयापाडा येथे नेण्यात येत असल्याचे समोर आले आहे. याबाबत पुढील (पान ४ वर)

## खंडणीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या, दोघांवर गुन्हा

शिरपूर दि.६ (का.प्र.): मानसिक त्रास व २० लाख रुपयांची खंडणी मागण्याच्या प्रकारास कंटाळून एकास आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या संशयावरुन दोन जणांविरोधात तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रवीण भिमराव पाटील (रा.बोराडी) असे आत्महत्या करणाऱ्या प्रौढाचे नाव आहे. त्यांचा मुलगा गणेश पाटील याने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याचा भाऊ शुभम याने एका मुलीसोबत मोबाईलवर चॅटींग केल्याच्या कारणावरुन २८ ऑगस्ट ते दोन सप्टेंबर या कालावधीत संशयित अमोल तथा सागर पांडूरंग पाटील व रवींद्र काशीनाथ मोरे (दोघे रा.बोराडी) त्याच्या (पान ४ वर)



## पिंपळनेरला गणपतीत डीजेला बंदी शांतता कमिटीच्या बैठकीत निर्णय

**पिंपळनेर, दि.६ (प्रतिनिधी)- पिंपळनेर पोलिस ठाण्यात आगामी गणेशोत्सव,सुरक्षित आणि उत्साहात साजरा करावा यासाठी पिंपळनेर पोलिस ठाण्यात शांतता कमेटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले.**

बैठकीत गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि डीजेमालकांची समन्वय बैठक पार पडली.उपविभागिय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या बैठकीत प्रशासनाने उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अनेक कडक नियम व मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. या बैठकीत आरोग्याला होणारा अपाय आणि जीवितास होणारा धोका टाळण्यासाठी पिंपळनेरसह ग्रामीण भागातही डीजे वाजविण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आल्याचे उपविभागिय अधिकारी सुधीर पाटील यांनी स्पष्ट केले.डीजे लावून मिरवणूक काढल्यास तो तात्काळ जप्त करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा सज्जड दम (पान ३ वर)

## धडगाव पोलिसांनी एक कोटी पाच लाखांचा गांजा शेतीमधील बेकायदेशीर लागवड केली उध्वस्त

**शहादा,दि.६(प्रतिनिधी)- धडगांव पोलीस ठाण्याच्या पथकाने गेंदा शिवारातील डोंगर भागात धाडसी छापा टाकून बेकायदेशीररीत्या लागवड केलेली गांजाची शेती पूर्णपणे उद्धस्त केली आहे. या कारवाईत पोलिसांनी २१० किलो ३४० ग्रॅम वजनाची हिरवी ओली गांजाची झाडे जप्त केली असून, त्याची आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार एकूण किंमत छ १,०५,१७,०००/- (एक कोटी पाच लाख सतरा हजार रुपये) इतकी आहे.**



धडगांव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल भाबड यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली होती की, गेंदा गावाच्या शिवारात डोंगर भागात एका इसमाने वनपट्ट्याच्या शेतात मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गुंगीकारक गांजा वनस्पतीची बेकायदेशीर लागवड केली आहे.

माहितीची खात्री पटल्यानंतर वरिष्ठांच्या परवानगीने पोलीस निरीक्षक सुनिल भाबड हे स्वतः राजपत्रित अधिकारी म्हणून हजर राहिले. त्यांनी तात्काळ पोलीस पथक तयार करून गेंदाचा उबरपाडा येथील शेतात पंचांसह छापा टाकला. या छाप्यादरम्यान आरोपी नामे आलशा मालसिंग पावरा (वय ४० वर्षे, रा.गेंदाचा उबरपाडा, ता.धडगांव, जि. नंदुरबार) हा शेतात गांजाच्या झाडांचे संवर्धन व जोपासना करताना रंगेहात मिळून आला. शेतातून मुळासकट उपटलेली ३ ते ५ फूट उंचीची (पान ४ वर)

## देशातील आठ उच्च न्यायाधिशांच्या बदल्या

नवी दिल्ली, दि.६- केंद्र सरकारने देशभरातील न्यायिक व्यवस्थेत मोठे फेरबदल करत ५ सप्टेंबर रोजी भारतातील विविध ८ उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि बदल्यांची अधिकृत घोषणा केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील कॉलेजियमशी सल्लामसलत करून या बदल्यांना मंजुरी दिली आहे.या नवीन फेरबदलांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाला देखील नवीन मुख्य न्यायाधीश लाभले असून, मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे यांची कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी (पान ४ वर)

## परफॉर्मन्सवर ठरणार आरोग्य अधिकाऱ्यांची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांचा निर्णय

**धुळे, दि.६- सार्वजनिक आरोग्य विभागात केवळ सेवाज्येष्ठता न पाहता प्रत्यक्ष कामकाजाच्या आधारे अधिकाऱ्यांना जबाबदारी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला आहे. यानुसार जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे दरवर्षी वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले जाईल.**

३१ मार्च २०२६ पर्यंत किमान तीन वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मागील तीन वर्षांतील (२०२३ ते २०२६) कामगिरीचा आढावा घेऊन १०० गुणांचे मूल्यमापन केले जाईल. या गुणांच्या आधारे अधिकाऱ्यांचे अ, ब, क, आणि ड अशा चार श्रेणींत वर्गीकरण होणार आहे. रुग्णसेवा व सुविधा: रुग्णालयातील स्वच्छता, आहार, औषध पुरवठा आणि तक्रार निवारण. निधी व्यवस्थापन: जिल्हा नियोजन, आणि निधीचा प्रभावी वापर. विशेष मोहिमा: ममाझे गाव आरोग्य संपन्न गावफ, कर्करोगमुक्त महाराष्ट्र आणि सिकलसेलमुक्त महाराष्ट्र उपक्रमांतील योगदान. डिजिटल कामकाज: आयुष्मान भारत, महात्मा (पान ४ वर)

## मारहाणीत वीज कर्मचारी जखमी आझादनगर पोलिसात गुन्हा दाखल

**धुळे, दि. ६ : बाळापूर येथे स्मार्ट मीटर बसवण्याचे काम करणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा शहरात त्याची पुनरावृत्ती झाली. मारहाणीत रक्तदाब प्रचंड वाढल्याने कर्मचाऱ्यास रुग्णालयात दाखल केल्याची घटना शनिवारी घडली. याप्रकरणी रात्री उशिरा आझादनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

वीज वितरण कंपनीच्या लालबाग शाखेचे कनिष्ठ कार्यालयीन सहायक राजेंद्र मधुकर वाघ, वरिष्ठ तंत्रज्ञ वासुदेव मालचे हे ५ सप्टेंबरला सकाळी गल्ली नं. ५, जे.बी. रोड कॉर्नर, जिनगर गल्लीजवळील अजिंक्य हॅण्डलूम या दुकानात स्मार्ट मीटर बसविण्यासाठी गेले होते. त्यांच्यासोबत एनसीसी या स्मार्ट मीटर एजन्सीचे यशवंत दुसाने व नीलेश ठाकूर हे कर्मचारी होते. या ठिकाणी अशोक खंडू वाणी (पिंगळे) या नावाने वीजजोडणी आहे. तेथे जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरू होते. यशवंत (पान २ वर)

**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,41,250 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## डिजिटल युगातील बदलांशी शिक्षकांनी अद्ययावत राहावे शिक्षक पुरस्कार वितरण प्रसंगी पालकमंत्र्यांचे आवाहन

**धुळे, दि.६- डिजिटल शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्याधारित शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शिक्षण क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. या बदलांशी शिक्षकांनी सातत्याने अद्ययावत राहून नवे ज्ञान आत्मसात करावे आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रभावी वापर करावा. बदलत्या जगातील आव्हाने आणि संधींसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शिक्षकांची आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



जिल्हा परिषद, धुळे यांच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी आमदार राघवेंद्र पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी (पान ४ वर)



# आपला महाराष्ट्र

## नंदनगरीतील पेपर फुटी : आपला चेहरा आणि आरसा

महाराष्ट्र राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या विभागातील औषध निरीक्षक परीक्षेतील पेपर फुटीचे प्रकरण राज्यभर सध्या गाजत आहे. त्याचे धागे दोरे नंदुरबारला असून आता आणखी एक प्रकरण या प्रकरणाशी जोडले गेले आहे. विभागाच्या मंत्र्यांच्या खाजगी सचिवाचे घर नंदुरबारला आहे. पेपर फुटीच्या प्रकरणी आरोपी असलेल्या इसमाच्या घरात मंत्र्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी भाड्याने राहतात. याप्रकरणी नंदुरबार मधून काही संशयितांना अटक करण्यात आलेली आहे. थेट मुंबईचे पथक या कारवाईत आहे. एक प्रेम प्रकरण देखील यातून बाहेर आले. एकमेकांच्या घरासमोर राहत असल्यामुळे प्रियकराने प्रेमिकेला पेपर दिला किंवा प्रेमिकेने प्रियकराला दिला अशी उलट सुलट चर्चा नंदुरबार मध्ये आहे. त्यात आता मंत्र्यांच्या विशेष अधिकाऱ्याची भर पडलेली आहे परंतु आपण योगायोगाने पेपर फुटी शी संबंधित असलेल्याच्या घरातील भाडेकरू आहोत असा खुलासा या अधिकाऱ्याने केला आहे. राज्य लोकसेवा आयोगाने २२ मार्च रोजी औषध निरीक्षक पदाची परीक्षा घेतली त्यात मुलाखती होऊन २२ जुलै रोजी ४८८ उमेदवारांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध झाली. मात्र त्या परीक्षेतील प्रश्न काही उमेदवारांना मिळाल्याचे लोकसेवा आयोगाला काही लोकांनी कळविले. ई-मेल द्वारा अशा प्रकारच्या तक्रारी आता ताबडतोब कळविण्यात येतात त्यामुळे त्याची लवकर चौकशी होते त्याप्रमाणे आयोगाने २७ जुलै रोजी गुन्हा नोंदविला. मुंबई येथील गुन्हे अन्वेषण शाखेकडून या प्रकरणाचा तपास चाललेला आहे. आतापर्यंत साथ व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे त्यात लोकसेवा आयोगाचे तीन कर्मचारी देखील आहेत. परिणामी आयोगाने ही भरती प्रक्रिया रद्द केलेली आहे.

एकीकडे झारखंड मध्ये अशाच संदर्भात आंदोलने झाली. दुसरीकडे जंतर-मंतरवर नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणी मोठे आंदोलन झाले. त्या आंदोलनाच्या निखाऱ्यावरची राख अजून थंड झालेली नसताना नंदुरबारचे पेपर फुटीचे प्रकरण बाहेर आले आहे. नंदुरबार सारख्या आदिवासी जिल्ह्यातील मुख्यालय असलेल्या शहरात औषध निरीक्षकाच्या परीक्षेचे पेपर फोडणारे वास्तव्याला आहेत ही बाब शिरीष कुमारचे हौतात्म्य लाभलेल्या शहराला लांच्छनास्पदच म्हटली पाहिजे. इतरही अनेक प्रकरणात विशेषता: आर्थिक भ्रष्टाचाराच्या संदर्भात या जिल्ह्याची कुख्याती आहे. त्यात भर पाडणारा पेपर फुटीचा मामला आहे. सर्वच क्षेत्रात आता बदललेल्या प्रवृत्ती दिसत आहेत. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार झाला, भौतिक विकास झाला, तंत्र शिक्षणाचा प्रसार झाला. जलद दळणवळणाची साधने आली त्यांचा वापर करून नवी पिढी वैचारिक दृष्ट्या अधिक प्रगल्भ होईल अशी अपेक्षा फोल ठरली आहे असे म्हणण्यास पुष्कळ वाव आहे. समजा हे प्रकरण बाहेर आले नसते तर फुटलेल्या पेपर वरून परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेले औषध निरीक्षक नोकरीत आले असते. त्यांच्या गुणवत्तेबद्दल शंका उपस्थित करण्याची देखील सोय नव्हती. हा सरळ सरळ जनतेच्या आरोग्याशी खेळ खेळला गेला असता. परंतु काही लोकांच्या सतर्कतेमुळे प्रकरण बाहेर आले. परीक्षा रद्द झाली. ते चांगलेच झाले. मात्र कितीही कडेकोट बंदोबस्त केला तरी तो भेदण्याची तयारी लोक ठेवत असतात. खाजगी क्लासेसचे जे पीक आले त्याचे चालक चोऱ्यांमध्ये अग्रेसर आहेत. त्यामुळे शिक्षणाचा व्यवसाय करणाऱ्यांवर लोकांनी आता फार मेहरबानी करू नये हेच श्रेयस्कर राहील. त्यामुळे शाळा आणि महाविद्यालये पुन्हा बहरतील. सध्या तर क्लासेस चालविणारे आणि अनेक महाविद्यालयांचे व्यवस्थापन यांचे अलिखित करार आहेत. विद्यार्थी फक्त शाळा कॉलेजात हजेरी लावण्यासाठी जातात. कारण त्यामुळे त्यांना बोर्डाच्या अथवा विद्यापीठीय परीक्षा देता येतात. म्हणजे डिग्री वाटप करणारी केंद्रे असे आता शैक्षणिक संस्थांचे स्वरूप निर्माण झालेले आहे. असे असेल तर ही व्यवस्थाच कशाला हवी यावर आता महाराष्ट्रात चर्चा सुरू झाली आहे

एका प्राध्यापकाची किंमत एक कोटी रुपयांहून अधिक आकड्यात मोजली जाते. आश्रम शाळेतील पाणी भरणारा किंवा सरपण फोडणारा कामाठी याचा दर २० लाख रुपये असल्याचे उघड उघड बोलले जाते. ही जर अवस्था शिक्षण क्षेत्रात असेल तर पिढी कशा प्रवृत्तीची निपजेल ते बघण्यासाठी कुठल्याही ज्योतिषाची आवश्यकता भासणार नाही. नंदुरबार मधील पेपर फुटीत सहभागी असलेल्यांनी ते दाखवून दिलेले आहे. दुसरीकडे राज्याच्या शालेय शिक्षण मंत्र्यांच्या महत्त्वाच्या अधिकारांवर सरकारने कात्री लावली असून ज्या संस्था अनुदानित आहेत त्यांना अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याचे तसेच विविध मंडळाच्या अभ्यासक्रमांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच नव्या तुकड्यांना आणि शाखांना मान्यता देण्याचे जे अधिकार शालेय शिक्षण मंत्र्यांकडे होते ते त्यांच्याकडून काढून घेऊन त्या विभागाचे सचिव किंवा शिक्षण आयुक्तांकडे सोपविण्यात आलेले आहेत. राज्यात सुमारे ३१ हजार अनुदानित संस्था आहेत. त्यावर आता मंत्र्यांच्या ऐवजी अधिकाऱ्यांचे वर्चस्व राहील. या निर्णयाचे संस्थाचालकांकडून स्वागत होत असले तरी एक प्रकारे महत्त्वाच्या यंत्रणेवर अविश्वास आणल्या सारखीच ही बाब म्हणावी लागेल. संस्थाचालकांच्या मते छोट्या-मोठ्या अनेक कामांच्या संदर्भात मंत्रालयीन पातळीवर भ्रष्टाचार वाढीस लागलेला आहे. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी हा निर्णय गरजेचा होता असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र मंत्री पातळीवरील यंत्रणा भ्रष्ट आणि राजकीय दृष्ट्या दबाव तंत्राचा वापर करणारी पण अधिकारी मात्र स्वच्छ प्रतिमेचे आहेत आणि ते आता शिक्षण क्षेत्रात शुद्धीकरणाचे काम करतील असे कोणी म्हणत असेल तर यावर विश्वास ठेवता येणार नाही अशीच परिस्थिति आहे. म्हणजे नागनाथ गेला आणि सापनाथ आला एवढाच काय तो फरक पडणार आहे. विश्वास कोणावर ठेवावा असा मुद्दा आहे. धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशीच सर्व क्षेत्रातील परिस्थिती आहे. त्यामुळे व्यवस्था बदलण्याचा हा मुद्दा आहे आणि तो जनतेच्या पुढाकारानेच यशस्वी होऊ शकेल. भ्रष्टाचारात गुंतलेले घटक देखील समाजातीलच एक असतात. म्हणजे प्रवृत्ती मुळात समाजातच आहे. ती नष्ट करावयाची असेल तर समाज वैचारिक दृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या प्रगल्भ झाला पाहिजे अशी शैक्षणिक व्यवस्था हवी. शेवटी मुद्दा संस्कारांवर येतो. आणि ते आता दुर्मिळ झालेले आहेत. घरात त्यांचा अभाव आहे. शाळा ही जबाबदारी आता घेत नाहीत. मुळात शाळा आणि शिक्षक हेच संस्कार आणि परंपरागत शिक्षण यापासून दूर चालले आहेत. स्वयंसेवी संघटना किंवा परिवर्तनवादी घटक आपल्या पातळीवर मुलांचे आणि तरुणांचे प्रबोधन करण्याचे प्रयतक अनेक वर्षांपासून करीत आहेत. परंतु त्यांच्या मर्यादा आहेत. त्या मर्यादेत राहून जेवढे काही करता येते तेवढेच ते करू शकतात. तेवढे लोक नैतिकदृष्ट्या काम करतानाही दिसतात हे त्यांच्या यशाचे गमक म्हणावे लागेल. परंतु समाजातील बहुतांश भाग हा बेजबाबदारपणा, देशाचे आपण काही देणे लागतो यासाठीच्या दृष्टीचा अभाव, कामाशी काम ही प्रवृत्ती, यामुळे वैचारिक दृष्ट्या आणि नैतिकतेच्या दृष्टीने कमी पडतो आहे. म्हणूनच स्त्रियांवरील अत्याचार असतील, अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना असतील, दरोडेखोरी असेल, अमली पदार्थाचे सेवन आणि निर्मिती असेल, वितरण असेल, भेसळ असेल, त्यातून लोकांच्या आरोग्याशी होणारा खेळ असेल असे अनेक मुद्दे संस्कारांच्या प्रक्रियेशी गुंतलेले आहेत. मात्र शिक्षण कसे असावे याबाबतचा आराखडा अजूनही विचारवंत किंवा त्या क्षेत्रातील तज्ञ तयार करीत नाहीत. ज्या विचारांचे सरकार असेल त्या विचारांचा प्रभाव शिक्षण क्षेत्रात कसा येईल असा प्रयत्न होत असतो. आणि म्हणून राजकीय क्षेत्रातील दिग्गज विचारवंतांचा वापर करून किंवा तज्ञांचा वापर करून तसा बदल घडवून आणतात. तो पुढच्या पिढ्यांसाठी पोषक असतोच असे नाही.

सध्या तर विज्ञानातील मूलभूत मूल्ये देखील अभ्यासक्रमातून काढून टाकण्याचा सपाटा सुरू करण्यात आलेला दिसतो. इतिहासात बदल करून चुकीचा तपशील त्यात घातला जातो. म्हणजेच वास्तवाशी फारकत असणारी दृष्टी शिक्षण क्षेत्रात थैमान घालत आहे. त्यास आवर कोण घालणार हा मुद्दा आहे. शेवटी सत्ते पुढे शहाणपण चालत नाही असेच म्हणण्याची पाळी आलेली आहे. मात्र असे असले तरी आता काही प्रकाशाची बेटे दिसू लागलेली आहेत. तरुणांच्या उठावशक्तीचा अविष्कार म्हणजेच ही प्रकाशाची बेटे म्हणावी लागतील. त्यांना हे जे काही सर्व चालले आहे ते नको आहे. त्यात बदल हवा आहे आणि त्यासाठी ते एकवटले आहेत. त्यातून उद्याच्या (पान ३ वर)



धुळे- देवपुरातील पांजरा नदीकिनारी असलेली जुनी चौपाटी येथे माऊली फाउंडेशन च्या वतीने आयोजित केलेली दहीहंडी मालेगावच्या शिवशंभू पथकाने फोडली या पथकाला पारितोषिक देताना बिग बॉस विजेता सुरज चव्हाण गायक सचिन कुमावत अभिनेत्री उर्मिला कानिटकर मयूर कुलकर्णी गौरव गीते हर्षल देशमुख आशु भडागे.

## एस.व्ही.के.एम. स्कूलच्या दक्ष मेहताची एएफएमसी प्रवेशात उल्लेखनीय कामगिरी

**धुळे, दि. ६ : एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल, धुळे येथील गुणवंत विद्यार्थी दक्ष कुणाल मेहता याची पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयात (एएफएमसी) प्रवेशासाठी ३४ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या या यशामुळे एसव्हीकेएम स्कूल, धुळेच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

दक्ष मेहता याने सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि ध्येयाप्रती असलेल्या दृढ निष्ठेच्या जोरावर हे यश संपादन केले. प्रतिष्ठित वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याचे स्वप्न साकार करत त्यांनी आपल्या कर्तृत्वाची प्रभावी छाप उमटविली आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकवर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भव्य यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, संचालिका गिरीजा मोहन, उपसंचालिका पियाली कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन यांनी दक्षचे कौतुक करत अभिनंदन केले. त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा देत, भविष्यातही अशीच उत्तुंग कामगिरी करण्यासाठी प्रेरणा दिली. दक्षच्या या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि त्याची सातत्यपूर्ण मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे. त्याच्या यशामुळे विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही आपल्या ध्येयाच्या दिशेने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली आहे. दक्ष मेहता यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे एसव्हीकेएम सीबीएसई स्कूल, धुळेसाठी हा अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण ठरला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन आणि उत्कृष्टतेचा ध्यास यांची विद्यालयाची परंपरा या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## बेटावद परिसरात पावसाची दडी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान

**बेटावद, दि.६- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद व परिसरातील सर्व ठिकाणी महिन्याभरापासून पावसाची दडी मारल्याने व ढगाळ वातावरण असल्यामुळे कापूस, मका, बाजरी, ज्वारी, मुग आदी पिकांच्या मोठ्या प्रमाणात व उत्पन्नात घट तसेच नुकसान झाले आहे.**

याबाबत वृत्त असे की, बेटावद परिसरातील गेल्या महिनाभरापासून पावसाने दांडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असल्यामुळे पावसाअभावी जमिनीवरील ओलावा झपाट्याने कमी होत असून ढगाळ वातावरण मुळे उत्पन्नात घट होत असताना शेतकऱ्याचे वादळी चर्चा सुरू आहे तसेच कापूस, मका, बाजरी, ज्वारी, मुग या पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घटल्यामुळे शेतकरी वर्ग चिंतेत आलेला असून केलेला खर्च सुद्धा निघाला नाही यावर शेतकऱ्याची मोठी चर्चा सुरू आहे तसेच इतर पिकं याच्या मोठा नुकसानीच्या सामना करावा लागणार आहे अशीही शेतकरी वर्ग कडून चर्चा सुरू आहे यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी केली बियाणे खते औषधी अशा महागड्या वस्तू शेतकरी टाकत असून त्यावर मशागत व मजुरीसाठी झालेला मोठा खर्च केल्यानंतर सुरुवातीला पिकाची परिस्थिती समाधानकारक होती मात्र गेल्या महिन्याभरापासून पावसाने पाठ फिरवून वातावरण ढगाळ झाल्यामुळे पिकांना आवश्यक असलेले ओलावा तसेच काही ठिकाणी पिकांची वाढ फुटल्याची शक्यता निर्माण झाली असून कापूस पिकाला मोठा फटका बसला आहे कापूस पिकाच्या वाढीवर महत्त्वाच्या टप्प्यात पावसाच्या मोठा खंड पडल्याने झाडाची वाढ मंदावली असून उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहे तसेच मका ज्वारी बाजरी मूग आदी पिकांनाही पावसाची नितांत गरज असून पावसाअभावी लांबलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतकरी चिंता व्यक्त करीत आहे तसेच मका बाजरी ज्वारी मुग आधी पिकांनाही पावसाची नितांत गरज असून पाऊस आणखी लाभल्यास उत्पादन काही येणार नाही असे शेतकरी वर्ग कडून चर्चिले जात आहे या शेतकरी कडे सिंचनाची सुविधा असते तरी ढगाळ वातावरणामुळे पिकांना मोठे नुकसान होत असते म्हणून पाणी असूनही शेतकरी वर्ग हा चिंतेत आहे मात्र सर्वत्र शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा नसल्यामुळे बहुतांश शेतकरी भीतीचे वातावरण निर्माण होत असून पिके वाचविण्यासाठी आता परिसरात दमदार पावसाची गरज निर्माण झाली आहे या दरम्यान राज्यातील काही भागात पावसाच्या खंडामुळे खरीप पिकावर परिणाम होत असल्याच्या बातम्या समोर येत असून पाऊस लवकरच झाल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता असून प्रशासनाने परिस्थिती पहाणी करून आवश्यक ती मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.



## यकृत प्रत्यारोपणासाठी साडेतीन लाखांची मदत- आ. राम भदाणेंच्या प्रयत्नांना यश

**धुळे, दि.६- धुळे ग्रामीण मतदारसंघातील फागणे येथील रहिवासी भटू प्रकाश पवार यांच्या यकृत प्रत्यारोपणाच्या उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ३ लाख ५० हजार रुपयांची भरीव मदत मंजूर करण्यात आली आहे. आमदार राम भदाणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मदत मिळाली आहे. ही मदत मंजुरीचे पत्र माजी सभापती तथा लोकनियुक्त सरपंच ज्ञानज्योती भदाणे यांच्या हस्ते देण्यात आले.**

फागणे येथील भटू पवार यांना यकृत प्रत्यारोपणासाठी मोठ्या खर्चाची गरज होती. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांनी आमदार राम भदाणे यांच्याकडे मदतीविषयी सांगितले होते. आमदार भदाणे यांनी तात्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यासंदर्भात अर्ज करून विशेष प्रयत्न केलेत. त्या प्रयत्नांना यश आले असून मुख्यमंत्री सहायता निधीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा या बँक खात्यात अर्थसहाय्य वर्ग करण्यात आले आहे. प्रथम नियमित मंजूर रक्कम दोन लाख रुपये आणि अधिक विशेष बाब म्हणून अतिरिक्त अर्थसहाय्य दीड लाख रुपये, असे एकूण साडेतीन लाख रुपये मंजूर झाले आहेत.

## नाबार्डतर्फे ग्रामीण नवसंशोधनाला चालना देण्यासाठी प्रकाशामध्ये रुटागे स्मार्ट व्हिलेज सेंटरचा शुभारंभ

**तळोदा, दि.६ (प्रतिनिधी)- ग्रामीण सक्षमीकरणाच्या देशाने एक महत्त्वाचा टप्पा गाठत, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) आज नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशा येथे प्रायोजित रुटागे स्मार्ट व्हिलेज सेंटर चे सकाळी ११ वाजता अधिकृत उद्घाटन केले. हे अत्याधुनिक केंद्र ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाची दरी मिटवण्यासाठी, स्थानिक पातळीवर उपयुक्त व प्रमाणित तंत्रज्ञान उपयोगात आणून उद्योजकता आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करेल.हा उद्घाटन सोहळा हायब्रीड (प्रत्यक्ष व आभासी) पद्धतीने पार पडला. यामध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवरील धोरणकर्ते, स्थानिक प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामीण भागातील परिवर्तन घडवून आणणारे घटक एकत्र आले होते.**

नाबार्डचे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. ए. के. सूद यांनी या केंद्राचे आभासी पद्धतीने उद्घाटन केले. या आभासी कार्यक्रमात नाबार्ड महाराष्ट्र




प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य महाव्यवस्थापक डॉ. ए. . भवानी शंकर, नाबार्ड प्रधान कार्यालय मुंबई येथून श्री. बी. आर. प्रेमी आणि भारत सरकारच्या मुख्य वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या स्ट्रॅटेजिक अलायन्स संचालक डॉ. सपना पोती हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी बायफ चे अध्यक्ष श्री. भरत काकडे, अविनाश तिवारी, उपमहाव्यवस्थापक नाबार्ड यांनी मार्गदर्शन केले. मनोज चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक श्री. दीपक बारहाते, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक श्री. नंदकुमार पैठणकर, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक डॉ. राजेंद्र दहातोंडे, संचालक, कृषी विज्ञान केंद्र श्री. दीपक पटेल, प्रकल्प संचालक, आत्मा श्रीमती राजनंदनी भिल्ल, सरपंच, प्रकाशा ग्रामपंचायतडॉ. प्रकाश पटेल, प्राचार्य, कृषी व महाविद्यालयस्थानिक मान्यवरांनी या उपक्रमाचे सामूहिक कौतुक केले.सदर प्रकल्प हा संपूर्ण महाराष्ट्रातून पहिले केंद्र असून ते नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुका मधील प्रकाशा या गावी ग्रामीण भागात स्थापन करण्यात आले आहे. सदर केंद्राच्या व त्यातून दिल्या जाणाऱ्या आधुनिक व उच्च प्रतीच्या तंत्रज्ञानाच्या कृषी उत्पन्नासाठी गुणवत्तापूर्व शेतीपूरक उत्पन्न वाढीस त्याची मदत होईल असा विश्वास नंदुरबार जिल्ह्याचे डी डी एम मा श्री रवींद्र मोरे यांनी व्यक्त यावेळी बोलताना व्यक्त केला .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवींद्र मोरे डी डी एम नाबार्ड जिल्हा नंदुरबार ,बायफ चे व्यवस्थापक श्री. देवेंद्र पाटील व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

## मारहाणीत वीज कर्मचारी जखमी

**(पान १ वरुन)** दुसाने हे मीटर काढत होते. त्यांच्याजवळ राजेंद्र वाघ उभे होते. त्यावेळी मोटारसायकलवर संतोष अशोक पिंगळे, अमोल अशोक पिंगळे आले, तुम्ही मीटर कसे व कोणाला विचारून बदलत आहात, असे विचारले. त्यावर वाघ म्हणाले की, बिल नीट येत नसल्याची तक्रार दिली होती. त्यावेळीच सूचना दिली होती की जुने मीटर बदलावे लागणार आहे. आता मीटर बदलण्याच्या यादीत तुमचे नाव आलेले आहे. त्यामुळे मीटर बदलत आहे. मीटर बदलायचे नसेल तर तुम्ही साहेबांशी बोलून घ्या. त्यावर एकाने वाघ यांच्या कानशीलात मारली. शासकीय कामात अडथळा आणला, ठार मारण्याची धमकी दिली. राजेंद्र वाघ यांना चक्कर येत होती. त्यांच्या मानेला, डोक्याला तसेच कानास डाव्या बाजूला इजा झाली. मारहाणीच्या धक्क्याने वाघ यांचा रक्तदाब इतका वाढला, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. संतोष अशोक पिंगळे अमोल अशोक पिंगळे यांच्यावर आझादनगर पोलिस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

## फार्मसीचे यश

शहादा,दि.४(प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणरे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२६ निकाल जाहीर झाला असुन शकुंतला पाटील बहुउद्देशीय संस्था संचलित शताब्दी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बामडोद येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.





प्रकाश में आज यकीन




धर्मेन्द्र शर्मीला टॉगोर, शेट्टी हेलन अनवर हुसेन डेविड अस्तिसेन इस्तेखार


## शब्दकोडे क्रमांक : २४४७



**आडवे शब्द :** १.देशाचे किंवा राज्याचे मुख्य शासन ४.कायदेशीर हक्क किंवा एखाद्या गोष्टीचा अधिकार ५.भारतातील पूर्वेकडील एक डोंगराळ राज्य ८.सातू ९.आईचे अपत्यावर असणारे निस्सीम प्रेम ११. रियाझ १२.धनुष्य १३.पूर्वजांकडून मिळालेली मालमत्ता १४.इंग्रजीत-मजा १५. दाराला लावायचे आंब्याच्या पानांचे मंगल चिन्ह १६.एखाद्या चांगल्या कामाची मिळालेली पावती किंवा कौतुक १७.मित्रांमधील घट्ट मैत्री किंवा स्नेहसंबंध २०.आशिया खंडातील आपला एक मोठा शेजारी देश २३.आकार किंवा संख्येत होणारी प्रगती २४.त्वचेला येणारी कंड २५. पराक्रमी किंवा ज्याचा पराभव करता येत नाही असा २६.तोरा, मिजास किंवा रुबाब २७. घोषणा किंवा पक्षाचा जयजयकार २८.इंग्रजीत-जा २९.समाजात असणारा आब किंवा आर्थिक विश्वासार्हता ३०.एकाच कुळातील पिढ्यांची परंपरा ३२. पराक्रम, शौर्य किंवा मोठा नावलौकिक ३३.जंगलातील एक हिंस्र पट्टेदार प्राणी ३४.इमारती लाकडासाठी प्रसिद्ध असलेले एक मोठे झाड ३५.एक जलाशयाचा प्रकार३७.तातडीचा संदेश किंवा माहिती पाठवण्याची जुनी पद्धत ३८.मोजणी किंवा संख्या मोजण्याची क्रिया ४०.अतिशय थंड किंवा बर्फासारखा गार ४२.गायी-गुरांना रात्री बांधण्याची हक्काची जागा ४४.दृष्टी ४६.विजेसारखी अतिशय चपळ असणारी स्त्री ४८.संधी,मोकळीक ४९.आकाश, गगन किंवा अंतराळ ५०.सर्व, संपूर्ण किंवा सगळे मिळून ५१.गणितातील दोन संख्या एकत्र करण्याची क्रिया **उभे शब्द :** १.नेहमी जागरूक, सावध किंवा हुशार असणारा २.मोठा आवाज किंवा ध्वनीचा नाद ३.मनाला आनंद देणारा किंवा रम्य असा ४.दान देणारा किंवा मोठा देणगीदार ५.दिवंगत अभिनेता सुनील दत्त जी आणि अभिनेत्री साधना यांचा एक भयपट ७.भारतीय शास्त्रीय संगीतातील एक प्रसिद्ध राग १०.चित्त ११.ब्रिटिश काळातील एक मानद पदवी किंवा पावसाची झडप १२.काम, कार्य किंवा नशीब १३.तंटा १४.आमिर खान,काजोल यांचा एक सिनेमा १६.निःस्वार्थ देणगी १८.वन १९.राजस्थानातील एक प्रांत २०. वस्तू २१.सातारा जिल्ह्यातील एक किल्ला २२.डौल,रुबाब २४.मिठाची चव असलेला किंवा खारट पदार्थ २६.रविवार २७.नासधूस किंवा मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान चाकाचे घर्षण थांबवण्यासाठी वापरतात ते तैलरूपी द्रव ३१.अभिनेता संजय दत्तचा एक सिनेमा ३४.सागाच्या लाकडापासून बनवलेला ३६.आठवड्याचा एक दिवस ३७.माज ३९.दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ४१.वाचन करणारा ४२.जमा ४३.शिकार ४५.पाणी ४७.क्षण-हिंदीत ४८.पंढरपूरची यात्रा

### शब्दकोडे क्रमांक : २४४६ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | हे | र | | ति | ख | ट | | न | वा | | ब |
| र | वा | | आ | स | रा | | अ | ग | र | ब | त्ती |
| वा | | न | ख | रा | | अ | र | ण्य | | ल | |
| | फ | | णी | | स | रा | व | | चा | क | र |
| त | ल | फ | | स | ह | | ली | ट | र | | जा |
| | क | ळ | वा | | म | जा | | क | | क | |
| सा | | बा | रा | म | ती | | क | म | त | र | ता |
| स | ल | ग | | ती | | च | म | क | | व | र |
| रा | व | | स | | ज | व | ळ | | जा | त | |
| | क | र | वं | द | | दा | | प | ळ | | वे |
| थो | र | | ग | | स | र | ब | त | | सा | त |
| डा | | क | डी | प | त्ता | | रा | न | टी | | न |




# अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूलमध्ये कबड्डी स्पर्धेला प्रतिसाद

**शिरपूर, दि.६- हॉकीचे महान खेळाडू आणि भारताचे दिग्गज क्रीडापटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त देशभरात साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसाठी हाऊसअंतर्गत कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.**

विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण तसेच निरोगी स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्याच्या उद्देशाने शाळेतील अँबर हाऊस, रुबी हाऊस, एमराल्ड हाऊस आणि सफायर हाऊस या चारही हाऊसमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. चारही हाऊसच्या संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अटीतटीच्या आणि चुरशीच्या सामन्यांमध्ये अँबर हाऊस संघाने प्रथम क्रमांक, रुबी हाऊस संघाने द्वितीय क्रमांक, तर एमराल्ड हाऊस संघाने तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी संपूर्ण स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट शिस्त, संघभावना, खिलाडूवृत्ती आणि परस्पर सहकार्याचे दर्शन घडविले. या स्पर्धेसाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटी व एस.व्ही.के.एम. क्रीडा समन्वयक कुणाल सुर्वे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# पिंपळनेरला गणपतीत डीजेला बंदी

(पान १ वरुन) प्रशासनाकडून देण्यात आला.मात्र नियम पाळून ठरवलेल्या ध्वनीमयदित बँड, ढोल-ताशे आणि इतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यास परवानगी असेल,विसर्जन मिरवणुकीसाठी केवळ नोंदणीकृत मंडळांनाच परवानगी दिली जाणार असून रात्री पर्यंतची वेळ निश्चित करण्यात आली आहे.प्रत्येक मंडळासाठी एक स्वतंत्र पोलिस अंमलदार नियुक्त करून पोलिस प्रशासन आणि मंडळांमध्ये उत्तम समन्वय साधला जाईल. गणपती आगमनाच्या मिरवणुकीस औपचारिक परवानगी नसली तरी गणपती बाप्पा वाजत-गाजत घेऊन जाण्यास पूर्ण मुभा असेल,असेही नमूद करण्यात आले.

मंडळांकडून सहकार्याची अपेक्षा

प्रशासनाकडून मंडळांना मार्गदर्शन करताना प्रत्येक मंडळाने दहा दिवसांसाठी अधिकृत वीज जोडणी घ्यावी, मंडपांमुळे वाहतुकीला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी अशा सूचना दिल्या,तसेच गणपतीच्या सुरक्षेसाठी स्वयंसेवकांच्या वेळा निश्चित करून चोवीस तास सदस्य उपस्थित राहावेत. आक्षेपार्ह मजकूर, प्रक्षोभक देखावे किंवा धार्मिक भावना दुखावणारे बॅनर्स लागू नयेत, असे आवाहन पोलिस निरीक्षक नामदेव संसारे यांनी केले. गर्दीच्या वेळी चोऱ्या व अनुचित प्रकार टाळण्यासाठी मंडळाच्या स्वयंसेवकांनी पोलिसांना पूर्ण सहकार्य करावे,असे सांगण्यात आले.

या बैठकीत सपोनी नामदेव सहारे,उपनिरिक्षक संदीप संसारे,प्रसाद रौंदळ,गोपनिय विभागाचे शिरसाठ, नगराध्यक्षा योगिता चौरे,उपनगराध्यक्ष योगेश नेरकर,संभाजी अहिरराव,नायब तहसिलदार सुभाष गांगुर्डे,डॉ. जितेश चौरे,हाजी जुहुर जहागिरदार, हाजीजावेद सैय्यद,प्रकाश पाटील, सतिष पाटील,बाबा पेंढारकर, अंबादास बेनुस्कर,सुदाम पगारे, जगदीश ओझरकर,चंदन सूर्यवंशी, गौतम पवार,मोतिराम पोतदार,विज मंडळाचे पदाधिकारी , पिंपळनेर शहर व परिसरातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या बैठकीस उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, शासकीय व निमशासकीय संस्था, सावकार व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

मिळकतीचे वर्णन : ता. जि. धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी म. न. पा. हद्दीतील मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील नगर भुमापन क्र. ३०५२ त्याचे क्षेत्र ४८८ चौ. मी. तसेच ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं. ५१/५२-२, ५३, ५४-१, ५४-३ ५५,५८-१+२ पैकी प्लॉट क्र. १२७ चे एकूण क्षेत्र ५५२५ चौ. फुट.

वरील मिळकत ही **सौ. सिमा अशोक जोशी, उर्मिला दत्तात्रय जोशी, वृषाली अभिजीत पोल, धनंजय दत्तात्रय जोशी, पुजा प्रसाद पंडीत, वैशाली योगेश भगरे, वंदना दिवाकर कुलकर्णी**, यांच्या मालकी हक्कातील असून त्यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : प्लॉट क्र. १२८ पश्चिमेस : ९ मीटर रस्ता,
दक्षिणेस : प्लॉट क्र. १३० उत्तरेस : ९ मीटर रस्ता

सदर मिळकत ही वर नमूद व्यक्तींच्या मालकी व ताबे उपभोगातील असून सदर मिळकत खरेदीचा सौदा आमचे अशिलाशी केला आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे हक्क जसे गहाण, सौदा, खरेदी, विक्री, कर्ज, गहाण, तथा टांच, बोझा, वहिवाट, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, बक्षिस, लिज, लिन, भाडे हक्क, आरक्षण तसेच न्यायिक प्रकरणे तसेच इतरही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी हरकती नोंदवाव्यात. तोंडी हरकती तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध करण्यात आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. वर नमूद मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदर मिळकत या निर्बोज व हस्तांतरणीय आहेत असे समजून सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. ०५/०९/२०२६

**ॲड.शैलेश प्रकाशसिंग राजपुत**
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे मो. ९३२६४४२१११

# नंदनगरीतील पेपर फुटी : आपला चेहरा आणि आरसा

(पान २ वरुन) **प्रगल्भ भारताचा उदय होईल अशी आशा करायला हरकत नसावी. नंदुरबारमध्ये उघडकीस आलेले औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील पेपरफुटीचे प्रकरण हे केवळ एका स्पर्धा परीक्षेतील गैरप्रकार म्हणून पाहून चालणार नाही. या प्रकरणाने आपल्या शिक्षणव्यवस्थेच्या आणि एकूणच समाजजीवनाच्या अनेक गंभीर प्रश्नांना पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहे. परीक्षेचा पेपर फुटतो, काही उमेदवारांना तो आधीच मिळतो, त्यातून ते परीक्षा देतात, उत्तीर्ण होतात आणि पुढे ते सरकारी सेवेत येतात ही साखळी केवळ परीक्षेच्या विश्वासार्हतेवर आघात करणारी नाही; ती थेट जनतेच्या भवितव्याशी आणि सार्वजनिक व्यवस्थेच्या गुणवत्तेशी संबंधित आहे. नंदुरबारची पेपरफुटी आपल्याला हा आरसा दाखवते आहे. त्या आरशात दोषी केवळ काही व्यक्ती दिसत नाहीत; संपूर्ण व्यवस्थेचे प्रतिबिंब दिसते .हा आरसा फोडण्याऐवजी त्यात दिसणारे आपले चेहरे बदलण्याची गरज आहे. आणि ही सुरुवात सरकारकडून होईलच असे नाही ती समाजातूनही व्हावी लागेल.**

## CHANGE NAME

My Old Name Was
**SUFIYA ABNO MASAUD AHMAD**
My New Name Is
**SUFIYA BANO MASAUD AHMAD ANSARI**
Add - Maulviganj 363/289, Iqbal Manzil, Qalandar Chouk, Dhule-424001

भारतीय स्टेट बँक
धुळे मुख्य शाखा, धुळे, ता.जि.धुळे

## कब्जा सूचना (POSSESSION NOTICE)

ज्याअर्थी, स्वाक्षरीकर्ते सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये भारतीय स्टेट बँकेचे अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटी इंटरेसट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील यादीनुसार मागणी सूचना जारी केली होती. सदर सूचनेत नमूद केलेली एकूण रक्कम आतिण त्यावरील व्याज, ही सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणाऱ्याला करण्यात आले होते.

कर्जदार सदर रक्कम भरण्यास अपयशी ठरल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (इनफोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या तारखेस वर्णन केलेलया मालमत्तेचा प्रातिनिधीक (सांकेतिक) कब्जा घेतला आहे. विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार हा खाली नपमूद केलेल्या उर्वरित थकबाकी आणि त्यावरील व्याजासाठी भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा धुळे च्या हक्काधीन राहील. कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणाऱ्याचे नान मागणी सूचनेची तारीख प्रातिनिधिक कब्जाची तारीख अचल मालमत्तेचे वर्णन मागणी सूचनेत दावा केलेली रक्कम.

| कर्जदार/हमीदार/ गहाणदार | मागणी नोटीसीची दिनांक | प्रतीकात्मक ताब्याची दिनांक | अचल मालमत्तेचे वर्णन | मागणी नोटीस मधील दाव्याची रक्कम |
|---|---|---|---|---|
| रविकिरण पोल्ट्री फार्म प्रोप्रा. पिंटू पुनमचंद मिस्त्री, प्रथमेश प्लाझा, फ्लॅट नं. एस/६, पंचायत समिती समारे, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे हद्दी | २३/०७/२०२१ | २४/११/२०२२ | सीटीएस नं.३१६७, प्रथमेश प्लाझा, स.नं.३५/क, वाडभोकर रोड, देवपूर, धुळे पुर्व : पॅसेज दक्षिण : कॉलनी रोड उत्तर : पार्किंग क्षेत्र वरची बाजू | रूपये १६,६५,९६२/- +व्याज, सोळा लाख पासष्ट हजार नऊसे बासष्ट +व्याज |

दिनांक : ०४/०९/२०२६, ठिकाण : धुळे

**अधिकृत अधिकारी**
**स्टेट बँक ऑफ इंडिया**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवभाने ता. जि. धुळे येथील गट नं. १८०/२अ१/१८०/२अ२ब पैकी प्लॉट नं. १ चे एकूण क्षेत्र ६८२४.१८ चौ. मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ३४०६.२५ चौ. मी. खाते नं. ७६०० आकार रु. पैसे ३४०.६३ चा प्रयोजनार्थ बखळ प्लॉट असलेली मिळकत यासी चतु:सिमा मंजुर आउटप्रमाणे.

सदर सविस्तर नमूद केलेली मिळकत ही **श्री.शेख अलफैज शेख मोहीयुद्दीन** रा. धुळे ता. जि. धुळे यांचे नावे व कब्जे ताबे उपभोगात आहे.सदर मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार आमचे पक्षकार **योगेश भुरा धनगर रा. खोकाळे** ता. जि. नंदुरबार यांनी मिळकत मालकांशी केलेला असून त्याबाबतची बयाणा देखील दिलेला आहे व त्याचप्रमाणे आमचे पक्षकार हे लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहे.

**तरी सर्वांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,** सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, संबंध देणे घेणे,मालकी हक्क, भाडेपट्टा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच वा वारस हक्क, खावटी, दु.म. जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (०७) सात दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर आल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणून खरेदी करतील नंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन तसेच त्यांचे सांगिणेवरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.धुळे दि. ०५/०९/२०२६

**ॲड.परवेझ निसार तांबोळी** मो. ७०२०३८१३९४
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे, पो.तु. ता. धुळे पैकी मनपा हद्दीतील मौजे येथील सि.स.नं. १२२१३/३, चे एकूण क्षेत्र ४२१.५० चौ. मी. या पैकी उत्तर- पूर्व भाग सत्ता प्रकार क व सर्व्हे नं. ४०३ पार्ट पैकी प्लॉट नं. ३ यापैकी उत्तर- पूर्व भागाचे क्षेत्र ७८.५४ चौ. मी. बखळ मिळकत, त्यासी चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे -

सदर मिळकतीचे सि. सर्व्हे उताऱ्यावरील फेरफार नोंद क्र. २९०८६ प्रमाणे **मजमुल हसन मोहम्मद शाबान अन्सारी** यांचे नावाची नोंद प्रमाणित केलेली आहे. सदर मिळकत आमचे अशिल नामे **अन्सारी दानियाल अबरार** रा. फिरदोस नगर, धुळे यांना कायम खरेदीने विक्री देणेबाबत सौदा केलेला असून बयाणा रक्कम दिलेली आहे. आमचे अशिल लवकरच सदर मिळकत खरेदीचा आवश्यक तो पुढील व्यवहार पूर्ण करणार आहेत. तरी उपरोक्त नमूद वर्णनाच्या मिळकतीत कोणाचेही कुठल्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लीज, लीन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी विक्री आदी व्यवहार तसेच न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी व कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकती आमच्याकडे नोंदवाव्यात. उक्त मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी, परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती तसेच फोनवर घेतलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त ना झाल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही. तसेच सदर मिळकत निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे गृहीत धरुन ठरलेल्या सौद्यानुसार आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र व अधिकार तसेच सांगण्यावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे. धुळे दि. ०५/०९/२०२६

**ॲड.नदीम एम. अन्सारी** मो. ९८२३७८७०५३
(ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी)जिल्हा न्यायाालय, धुळे,
ऑफिस : ६१, गफूर नगर, वडजाई रोड, धुळे ता.जि. धुळे महाराष्ट्र

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**स. नं. ४१५/१ ते ५ पैकी प्लॉट नं. ४४ चे एकूण क्षेत्र २७९.०० चौ. मी. बखळ प्लॉट हे वाल्मीक मार्तंड हराळ यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे**

मिळकतीचे मालक **वाल्मीक मार्तंड हराळ**, रा. माणिक नगर, धुळे यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दि. ०६/०९/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच बँक, वित्तीय संस्था व पतपेढी यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिल श्री. राजेंद्र चिंधुजी पाटील रा. मयुर शाळेजवळ, देवपूर, धुळे ता. जि. धुळे यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत,बखळ प्लॉट हिस्सा, हितसंबंध,गहाण, बोजा,टाच, जप्ती, सौदा पावती, करार, वहिवाट, मुखत्यारपत्र, कुळवहिवाट, खरेदीखत, अदलाबदल खत,मृत्यूपत्र, वारस हक्क, बक्षीस पत्र, सिमावाद तसेच क्षेत्रबाबतचा वाद, वेचन सौदापावती करार,न्यायालयात वाद असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे तसेच निकालाची प्रत, भाडे करारनामा, कब्जा असल्यास सदर संबंधीत व्यक्तींनी खालील सही करणार यांच्याकडे सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत प्रत्यक्ष भेटून व कागदपत्रे दाखवून व सदर जाहीर नोटीस व सूचना मिळूनही कोणीही खालील सही करणार यांना योग्य त्या कागदपत्रांनिशी प्रत्यक्ष न भेटल्यास किंवा त्यांचे समाधान करण्यास असमर्थ ठरल्यास आमचे पक्षकार खालील परिशिष्टात नमूद मिळकत निर्वेध व निजोखीम व बोजाविरहीत आहे, असे समजून खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मात्र कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास सदरची हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

मौजे वलवाडी ता. जि. धुळे भुमापन क्रमांक व उपविभाग सर्व्हे नं. १३२/१/२८ चे क्षेत्र १५० चौ. मीटर, आकार १५.०० पै. त्याच प्रमाणे ज्याच्या चतु:सिमा उताऱ्याप्रमाणे.

पुर्वेस : ९ मीटर रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ४७
उत्तरेस : प्लॉट नं. २७ दक्षिणेस : प्लॉट नं. २९

सदरची जाहीर नोटीस आमच्या पक्षकारांनी सांगितल्या वरुन व माहिती दिल्यावरुन आज रोजी आमच्या मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे दि. ०६/०९/२०२६

**ॲड.चक्षुपाल आनंदा बोरसे,** मो. ९०१११९०२६९
प्लॉट नं. १५, गोवर्धन सोसायटी, चावला इंग्रजी शाळे जवळ, वलवाडी, धुळे ४२४००२

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ७८९/२०२६

**१) कुसुमबाई शिवरम पाटील २) जिजाबाई वसंत पाटील**
**३) प्रदीप वसंत पाटील**
अर्जदार नं.१ ते ३ रा. भटाणे ता. शिरपूर जि.धुळे
४) अलकाबाई संजय पाटील,
रा. घुमावल पो. तावसे ता. चोपडा, जि. जळगांव
५) साधना दयानंद देवरे रा. क्वार्टर नं. ३३/जी, टाईप ३, ऑर्डन्स, फॅक्टरी इस्टेट, वरणगांव ता. भुसावळ, जि. जळगांव
६) मनिषा सुनिल पाटील,
रा. शांती नगर, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.वसंत शिवराम पाटील हे दि. ०९/०९/२०२३ रोजी मौजे भटाणे, ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक २८/९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. १२/८/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ८०१/२०२६

**१) सुंदरबेन उर्फ मंजुळाबाई दत्तात्रय बारी, २) ललिता संतोष बारी,**
**३) भाग्यश्री संतोषभाई बारी, ४) निशा संतोषभाई बारी,**
**५) चिरागभाई संतोषभाई बारी अ. नं. ५ तर्फे अ. पा.क. आई म्हणून**
अ. नं.२ सर्व रा.तडकेश्वर मोहल्ला, विश्वकर्मा मंदिर समोर, आझादनगर रोड, भटार सुरत सिटी जि. सुरत ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. संतोष दत्तात्रय बारी हे दि. २९/११/२०२२ रोजी मौजे तडकेश्वर मोहल्ला, मोची मोहल्ला, भटार, सुरत सिटी, जि. सुरत येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला मौजे पुरा गल्ली, शिरपूर बुाा ता. शिरपूर जि. धुळे येथे मालमत्ता नं. १ ४३४/२ मिळकतीवर वारसांची नावे लावणेसाठी तसेच शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक ०१/१०/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ०८/०८/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ७७५/२०२६

**१) ठाणसिंग मुळा पावरा, २) सुभाष ठाणसिंग पावरा,**
**३) रमेश ठाणसिंग पावरा,** नं. १ ते ३ रा. चिंचपाणी ता. शिरपूर जि. धुळे
**४) गिताबाई निलेश पावरा,**
**रा. मालकातर ता. शिरपूर जि. धुळे** ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार ठाणसिंग मुळा पावरा वगैरे यांनी मे. न्यायालयात नामे वारीबाई ठाणसिंग पावरा ह्या दि. ०६/०९/२०२४ रोजी मौज़जे चिंचपाणी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे वारीबाई ठाणसिंग पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २४/९/२०२६ रोजी ठिक १०.३०वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज नं. ७७३/२०२६

**प्रकाश भरतसिंग जाधव वगैरे** ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

X

**कमलाबाई भरतसिंग राजपूत,**
**मयताचा पत्ता : रा. मांजरोद ता. शिरपूर जि. धुळे**
**मृत्यू दि. ०५/१२/२०१९** ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात कमलाबाई भरतसिंग राजपूत हे दिनांक ०५/१२/२०१९ रोजी मांजरोद ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले. त्यामुळे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास यांनी दि. २४/०९/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. १२/८/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ७९३/२०२६

**१) रणजितसिंह उर्फ रणजितसिंग देवीसिंह राजपूत,**
**२)महेंद्रसिंग रणजितसिंग राजपूत**
**३) प्रतापसिंग रणजितसिंग राजपूत,**
**४) अजुंषा महेंद्रसिंग राजपूत**
**वरील सर्व रा. जनता नगर, मारुती मंदिराजवळ, शिरपूर**
ता. शिरपूर जि.धुळे ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.विमलबाई रणजितसिंग राजपूत हे दि. १५/०३/२०२४ रोजी मौजे **जनता नगर, मारुती मंदिराजवळ, शिरपूर** ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक २९/९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. १३/०८/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ८०५/२०२६

**१) इंदूबाई जयवंत सौंदाने,**
**२) रंजना संजय कोळी,**
**३) मेघा संजय कोळी,**
**४) सोनाली संजय कोळी**
**५)किंजल संजय कोळी** ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. संजय जयवंत कोळी हे मौजे भटाणे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक ०१/१०/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. १८/०८/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ७८७/२०२६

**१) शोभा सोमा चौधरी, रा. चौधरी गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे**
**२) मनिषा प्रकाश करंकर , ३) पुनम बिपीन चौधरी**
**४) चित्रा राजेश शिरसागर, ५) आरती प्रविण चौधरी**
**६) जयेश सोमा चौधरी,**
**सर्व रा. चौधरी गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे** ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

X

**सोमा रामदास चौधरी मृत्यू दि. २१/०२/२०२५**
**रा. चौधरी गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे** .... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. शिरपूर न्यायालयात मयत नामे सोमा रामदास चौधरी हे दि. २१/०२/२०२५ रोजी **मौजे चौधरी गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे** येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काही एक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास यांनी दि. २८/०९/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काही एक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. १२/८/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस नि.६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ८०४/२०२६

**१) पुजाबेन प्रमोद पटेल**
**२) प्राची प्रमोद पटेल**
**३) अंशुमन प्रमोद पटेल** ... अर्जदार

॥ विरुद्ध ॥

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. प्रमोद सोमजी पटेल हे मौजे वरुळ ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसा संबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दिनांक २४/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. १९/०८/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर
जि. धुळे जि. धुळे

## पान १ वरुन

### लिबरेश आर्मीचा पाकिस्तानी लष्करावर हल्ला

या दोन्ही घटनांबाबत पाकिस्तानच्या लष्कराने अद्याप अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही. त्यामुळे मृतांची संख्या आणि हल्ल्याचे नेमके स्वरूप स्वतंत्रपणे निश्चित झालेले नाही.

गेल्या काही महिन्यांपासून बलुचिस्तानमध्ये बलुचिस्तान लिबरेशन आर्मी आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमधील संघर्ष तीव्र झाल्याचे वृत्त आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने गेल्या महिन्यात बलुचिस्तानातील विविध भागांत ३६ कारवाया केल्याचा दावा केला होता. या कारवायांमध्ये ३३ पेक्षा अधिक पाकिस्तानी सैनिक ठार झाल्याचे संघटनेने म्हटले होते. बलुचिस्तान लिबरेशन आर्मीच्या कारवायांमध्ये लष्करी तळ, सुरक्षा दलांचे ताफे आणि महत्त्वाच्या वाहतूक सुविधांना लक्ष्य करण्यात आल्याचे सांगितले जाते. मार्च २०२५ मध्ये झालेल्या जाफर एक्सप्रेस अपहरणाच्या कारवाईतही बलुचिस्तान लिबरेशन आर्मीच्या फतेह स्क्वॉडचा सहभाग असल्याचा दावा करण्यात आला होता.

पाकिस्तान : ५० दहशतवादी ठार

दरम्यान, पाकिस्तानी सैन्यानेही बलुचिस्तानातील मस्तुंग, सिबी, क्वेटा आणि कलात जिल्ह्यांमध्ये कारवाया केल्याचा दावा केला आहे. या कारवायांमध्ये सुमारे ५० दहशतवादी ठार झाल्याचे पाकिस्तानी लष्कराने म्हटले आहे. मृतांमध्ये बलुचिस्तान लिबरेशन आर्मी आणि तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानशी संबंधित सदस्यांचा समावेश असल्याचा पाकिस्तानचा दावा आहे. बलुचिस्तानमध्ये बलुचिस्तान लिबरेशन आर्मीसह विविध बंडखोर गट आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. बलुच गटांकडून पाकिस्तान सरकारवर मानवाधिकार उल्लंघनाचे आरोप केले जातात, तर पाकिस्तानकडून या गटांना सशस्त्र दहशतवादी संघटना म्हणून संबोधले जाते.

### विषारी दारूचे अकरा बळी

कॉलेजमध्ये उपचारासाठी पाठवण्यात येत आहे. मेथिल अल्कोहोलचे सेवन झाल्याचा संशय प्रशासनस आहे. जिल्हाधिकारी प्रतिभा पाल यांच्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात या मृत्यूमागे मेथिल अल्कोहोलच्या सेवनाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या २ ते ३ शवविच्छेदनांमधूनही प्राथमिकदृष्ट्या मेथिल अल्कोहोलचे सेवन झाल्याचे संकेत मिळाल्याचे त्यांनी सांगितले. गंभीर रुग्णांना बुंदेलखंड मेडिकल कॉलेज आणि सागर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

### सतर्कतेमुळे युवकाचे वाचले प्राण

पुलावरून उडी घेण्यापासून रोखले आणि त्याला सुरक्षितपणे धोकादायक भागापासून दूर केले. यानंतर युवकाला प्रकाशा येथील तापी हॉटेलमध्ये थांबवण्यात आले. आ. पाडवी यांनी मनीषशी संवाद साधत त्याला धीर दिला. त्याच्या अडचणी जाणून घेण्याचा तसेच त्याला मानसिक आधार देण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, युवकाच्या कुटुंबीयांशी तात्काळ संपर्क साधण्यासाठी आ. राजेश पाडवी यांनी न्यूबन येथील सरपंचांना फोन केला. घटनेची माहिती देत मनीषच्या वडिलांना कोणताही विलंब न करता प्रकाशा येथे येण्यास सांगितले. सरपंचांच्या माध्यमातून युवकाच्या वडिलांना तातडीने घटनास्थळी बोलावण्यात आले. काही वेळात मनीषचे वडील प्रकाशा येथे पोहोचल्यानंतर युवकाला त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. आपल्या मुलाला सुखरूप पाहून कुटुंबीयांनी आ. राजेश पाडवी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले. योग्य वेळी परिस्थिती ओळखून तात्काळ मदतीसाठी धाव घेतल्यामुळे एका तरुणाचे प्राण वाचले. आमदार राजेश पाडवी यांनी दाखवलेले प्रसंगावधान, संवेदनशीलता आणि तत्परता यामुळे प्रकाशा पुलावर घडू शकणारी मोठी दुर्घटना टळली. या घटनेनंतर आमदार पाडवी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या धाडसी आणि माणुसकीच्या भूमिकेचे परिसरातून कौतुक होत आहे.

### गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन

उपस्थित होते. यावेळी महिलांना मार्गदर्शन करताना आमदार अग्रवाल म्हणाले की, महिलांच्या हातात कौशल्य असेल तर त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात. एका महिलेला आत्मनिर्भर केल्यास त्याचा फायदा केवळ त्या महिलेलाच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाला होतो. त्यामुळे महिलांनी मिळालेल्या संधीचा उपयोग करून शिलाई व्यवसाय सुरू करावा. घरातूनच रोजगार निर्माण करून कुटुंबाला आर्थिक आधार देण्याबरोबरच भविष्यात इतर महिलांनाही रोजगार देण्याची क्षमता निर्माण करावी.

मशिलाई मशीन हे केवळ एक साधन नसून रोजगार आणि आत्मनिर्भरतेचे माध्यम आहे,फ असे सांगत त्यांनी लाभार्थी महिलांना मिळालेल्या मशीनचा योग्य वापर करून स्वतःचा व्यवसाय उभारण्याचे आवाहन केले. महिलांनी परिस्थितीवर मात करून पुढे जाण्यासाठी आत्मविश्वास कायम ठेवावा. शासनाच्या विविध योजना तसेच सामाजिक संस्थांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.सूर्योदय फाउंडेशन ही सामाजिक व जनकल्याणकारी संस्था असून समाजातील गरजू, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविते. महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जनजागृती या क्षेत्रात संस्था कार्यरत आहे. महिलांना शिलाई, कशिदाकाम आदी कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, तसेच गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन व आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, हा संस्थेच्या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. या माध्यमातून महिलांना घरबसल्या उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊन त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळणार आहे.

### विवाहितेची आत्महत्या

मृत घोषीत केले. अनिताचे माहेरचे नातेवाईक राहुल गुलाब माळी (रा. माळीवाडा, नंदुरबार) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित पती विठठल माळी, सासु कल्पनाबाई पंढरीनाथ माळी, दिर किशोर पंढरीनाथ माळी, दीराणी शुभांगी किशोर माळी (सर्व रा. कापडणे), नणंद ज्योती दीपक माळी, दीपक दौलत माळी (दोघे रा. नेर ता. धुळे) यांच्याविरुद्ध सोनगीर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. पती विठ्ठल माळी, सासु कल्पनाबाई माळी, दिर किशोर माळी, शुभांगी माळी यांना अटक केली. पोलीस उपनिरीक्षक प्रशांत ताकटे तपास करीत आहेत.

### फेडरेशनसमोर शहांचे मार्गदर्शन

डॉ.भास्कर पाटील, कार्यकारी संचालक उदय शिनकर , देविदास पाटील,डॉ. दरबारसिंह गिरासे,सुरेश जैन, कैलास गोगड , शरद पाचपुते, उषा साळुंखे, सर्जेराव पाटील,नरेंद्र अहिरराव,आदी उपस्थित होते .पतसंस्थांचे थकीत कर्ज एन.पी.ए . येत येऊ नये यासाठी संचालक मंडळ व कर्मचारी यांनी समन्वय साधून यातून मार्ग काढवा . कर्जदार व पतसंस्था यांचे उत्तम समन्वय हेच कर्ज एन.पी.एत जाणार नाही. असे मत एन.पी. ए . आणि व्यवस्थान वसुली कायदेशीर व्यवहार व शंका समाधान या विषयावर सुशांत वाडीले यांनी प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना केले. तसेच कमलाकर जोशी यांनी कर्डा वसूली प्रक्रिया सॉफ्टवेअरची माहिती सादर केली. हे पतसंस्थासाठीअतिशय महत्वाचे असल्याचे सांगितले. जावेद एस बेपारी यांनी डीजिटल /इलेक्ट्रानिक्स सुरक्षा याचा डेमो स्टेशन सादर करून इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान सुरक्षेचे महत्व आधुनिक काळात गरजेचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फेडरेशनचे सचिव बि. टी. देवरे , आभार संचालक रवींद्र वाणी यांनी मानलेत. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्यवस्थापक गोकूळ पाटील, विलास बोरुडे, विजय सोनगिरे, निलेश जयस्वाल, म्हसाई माता पतसंस्था निजामपूर , सतीदेवी पतसंस्था बोराडी,आदी पतसंस्थांच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतलेत.

### वर्गणीच्या नावाखाली खंडणीची वसुली

असे त्याने सांगितले. त्यानंतर लोखंडी कटर व कोयता सचिन सोनारच्या पोटाला लावला. त्याच्या वडिलांना धक्काबुक्की व शिवीगाळ करुन गल्ल्यातून साडेपाच हजार रुपये काढून घेतले. संशयिताविरोधात शहर पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून सहायक निरीक्षक सतीश भांड तपास करीत आहेत.

## पान १ वरुन

### पेपरफुटी प्रकरणाच्या तपासासाठी..

शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पाटील यांच्या संपत्तीशी संबंधित कागदपत्रे आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी नेमक्या कोणत्या कारणासाठी करण्यात आली, याबाबत तपास यंत्रणेकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे या कारवाईतून तपासात कोणते नवीन धागेदोरे हाती लागतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

### बसस्थानक परिसरात विदेशी दारू जप्त

तपास सुरू असून सदर प्रकरणी आरोपीताविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई), १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास पोहेकॉ/२८९ सुरेश मोरे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नंदुरबार श्रीमती अश्विनी सानप मॅडम, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकुवा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अर्जुन पटले यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकातील पो.हे.कॉ. सुरेश मोरे, पो.शि.रितेश बेलेकर, पो.शि.विकास शेलार, पो.शि.चेतन वानखेडे, पो.शि.कल्पेश कर्णकार व चालक पो.शि.राजू मोरे यांनी केली.

### खंडणीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

घरी जाऊन मोबाईल हिसकावून त्याची आई व काका यांना मारहाण करुन शिवीगाळ करीत होते. प्रवीण पाटील यांना मानसिक त्रास देऊन त्यांच्याकडे २० लाख रुपयांची खंडणी मागत होते. या त्रासाला कंटाळून पाटील यांनी आत्महत्या केली. उपनिरीक्षक मिलिंद पवार तपास करीत आहेत.

### बेकायदेशीर लागवड केली उध्वस्त

एकूण १४ पांढऱ्या कापडात बांधलेली २१० किलो ३४० ग्रॅम गांजाची झाडे (किंमत छ १,०५,१७,०००/-) पंचांसमक्ष जप्त करून सीलबंद करण्यात आली.

या प्रकरणी फिर्यादी पो.कॉ. जलसिंग वाडग्या वसावे यांच्या फिर्यादीवरून आरोपी आलशा मालसिंग पावरा याच्याविरुद्ध धडगांव पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५९/२०२६, एन.डी.पी.एस. क्ट ( ) १९८५ चे कलम ८(क), २०(ब)()(क) अन्वये गुन्हा नोंदवून त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल सोनवणे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे व उपविभागीय पोलीस अधिकारी, शहादा भाग गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल भाबड, पोलीस उपनिरीक्षक विशाल सोनवणे, पोहेकॉ.शिवलाल गुजन्या पावरा, पोहेकॉ.सुभाष बापु तमखाने, पोकॉ.विश्वजीत प्रतापसिंग चव्हाण, पोकॉ. मनिष रामसिंग पावरा, पोकॉ. अशोक उत्तम पाडवी, पोकॉ.किरण सुरेश भिल, पोकॉ.दिपक मालचे, पोकॉ.जलसिंग वाडग्या वसावे (फिर्यादी), पोकॉ. किरण डिंगबर पाडवी, पोकॉ.मानसिंग होमा वळवी, पोकॉ. प्रशांत यादव, चापोना.सुनिलकुमार बाळू सुर्यवंशी यांनी केली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल भुसारे करीत आहे.

## पान १ वरुन

### आठ उच्च न्यायाधिशांच्या बदल्या

पदोन्नती करण्यात आली आहे. महत्त्वाच्या बदल्या आणि नियुक्त्या खालीलप्रमाणे: मुंबई उच्च न्यायालय: अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कलकत्ता उच्च न्यायालय: मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आता कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळतील. राजस्थान उच्च न्यायालय: छत्तीसगड उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार अग्रवाल यांची राजस्थान उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. पटना उच्च न्यायालय: दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती वल्लुरी कामेश्वर राव यांची पटना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालय: न्यायमूर्ती अश्वनी कुमार मिश्रा हे आता या न्यायालयाचे नवीन मुख्य न्यायाधीश असतील. छत्तीसगड उच्च न्यायालय: ओरिसा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कृष्ण राम महापात्रा यांच्याकडे छत्तीसगड उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. मध्य प्रदेश उच्च न्यायालय: गुजरात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अल्पेश यशवंत कोगजे यांची मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी वर्णी लागली आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालय: राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पुष्पेंद्र सिंह भाटी यांची या न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायालयीन कामकाजात गती आणण्यासाठी आणि प्रलंबित खटल्यांचा निपटारा करण्यासाठी या नियुक्त्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. केंद्रीय कायदा मंत्रालयाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली असून, आगामी काही दिवसांत हे सर्व नवनियुक्त मुख्य न्यायाधीश आपापल्या पदाची शपथ घेतील.

### परफॉर्मन्सवर ठरणार आरोग्य अधिकाऱ्यांची..

फुले जनआरोग्य योजना आणि पोर्टलवरील कामगिरी. सचोटी व चारित्र्य: शिस्तभंगाची कारवाई न होणे आणि निर्विवाद सचोटी असणे अनिवार्य. या निर्णयामुळे आरोग्य विभागात पारदर्शकता येऊन उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### डिजिटल युगातील बदलांशी..

अधिकारी राजेश इंगळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी स्वरांजली पिंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सक्वेहा पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनिष पवार, प्राथमिक शिक्षणाधिकारी वैभव वाचकर, प्राचार्या सुचेता पाटील, जिल्हा कृषी अधिकारी कावेरी राजपूत यांच्यासह उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक तसेच शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले, शिक्षकाचे कार्य केवळ पुस्तकातील ज्ञान देण्यापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणे, त्यांच्यात मूल्ये रुजविणे आणि त्यांना जबाबदार नागरिक म्हणून घडविणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. मूर्तिकार जसा दगडाला पैलू पाडून मूर्ती घडवतो, त्याचप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना पैलू पाडून त्यांचे भविष्य घडवतो. म्हणूनच भारतीय संस्कृतीत आई-वडिलांप्रमाणे गुरूलाही अत्युच्च स्थान आहे.जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्य, शेतकरी व शेतमजूर कुटुंबांतील विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांना दर्जेदार शिक्षण आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देण्याची विशेष जबाबदारी शिक्षकांवर आहे. जिल्हा परिषद व महानगरपालिका शाळांमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज देश-विदेशातील मोठ्या संस्थांमध्ये नेतृत्व करत आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्याला घडविण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. धुळे जिल्ह्यातील प्रत्येक मुला-मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी जिल्हा वार्षिक योजना व अन्य उपलब्ध निधींच्या माध्यमातून शाळांच्या सुविधांच्या बळकटीकरणासाठी प्रयतक करण्यात येतील. धुळे हा आकांक्षित जिल्हा असून शिक्षणाच्या गुणवत्तेत जिल्ह्याला राज्यातील आघाडीच्या जिल्ह्यांच्या बरोबरीनेच नव्हे, तर त्यांच्यापेक्षा दोन पावले पुढे नेण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि शिक्षकांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

### सत्यजित राजपूत यांचे निधन



नंदुरबार (प्रतिनिधी)- बेंगळुरू येथील ओरॅकल कंपनीचेग्लोबल हेड सत्यजित (गोपाल दादा) गुलजारसिंह राजपूत (५२) यांचे दि. ०५ सप्टेंबर २०२६ रोजी शनिवारी दुपारी १२ वाजता बेंगळुरू येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने राजपूत परिवारासह नंदुरबार शहरात शोककळा पसरली आहे.त्यांची अंत्ययात्रा दि.७ रोजी सकाळी १० वाजता प्लॉट क्र. १, विमलेंद्र नाकोडा नगर, स्वागत पेट्रोल पंपासमोर, नंदुरबार येथील राहत्या घरून निघणार आहे.त्यांच्या पश्चात वडील प्रा. गुलजारसिंह बाबुराव राजपूत, काका रणवीरसिंह बाबुराव राजपूत, काका राजेंद्रसिंह बाबुराव राजपूत, भाऊ प्रशांतसिंह गुलजारसिंह राजपूत, भाऊ पंकजसिंह देवीसिंह राजपूत, पुतण्या सुबोध सुवर्णसिंह राजपूत आणि मुलगा प्रत्यूष सत्यजित राजपूत असा परिवार आहे.

### शिपायाला मारहाण

**(पान १ वरुन)** चार सप्टेंबरला घडली असून तीन जणांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जखमी विनोद रतन सोनवणे (वय ३०) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याने संशयितांना रस्त्यावर आरडाओरड व शिवीगाळ का करता असे विचारल्याचा राग आल्याने संशयितांनी त्याला मारहाण केली. जितेंद्र सुकलाल कोळी, ओम जितेंद्र कोळी व लकी जितेंद्र कोळी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून हवालदार प्रमोद ईशी तपास करीत आहेत.


## नोकरीच्या सुवर्णसंधी

**एकदंत स्पिनिंग प्रा. लि.** तर्फे आमच्या वाढत्या संस्थेसाठी पात्र, अनुभवी व प्रमाणिक उमेदवारांकडून खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

ठिकाण : अवधान MIDC, धुळे येथील स्पिनिंग मिल




रिक्त पदे :
- Sr. Accountant – वरिष्ठ लेखापाल
- Jr. Accountant – कनिष्ठ लेखापाल
- Electrician – इलेक्ट्रीशियन
- MIS Executive – एमआयएस कार्यकारी

व्यावसायिक क्षेत्रात प्रगती करण्याची इच्छाअसलेल्या तसेच **कापड उद्योगातील प्रगतिशील संस्थेसोबत करिअर घडविण्यास इच्छुक** उमेदवारांनी अर्ज करण्यास प्रोत्साहित केले जाते.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपला अर्ज सादर करावा.

ekdanta SPINNING

संस्था : एकदंत स्पिनिंग प्रा. लि.
कार्यालय : अवधान MIDC, धुळे, महाराष्ट्र
उद्योग : स्पिनिंग / टेक्सटाईल मॅन्युफॅक्चरिंग
ई-मेल : hr@ekdantaspinning.com संपर्क : 8669988654

"आपल्या उज्ज्वल करिअरसाठी आमच्या वाढत्या टीमचा एक भाग बना!"



## होम ट्यूटर

घरी येऊन क्लास (ट्यूशन) घेतले जाईल.
-: विषय :-
Physics, Maths, Chemistry, Biology Science
5 th to 12 th
-: संपर्क :-
प्रो.जितेंद्र निकम
9665173176
9637566046



## गणपती बाप्पा मोरया

बाप्पाच्या आवडीचे **मोदक** फक्त मदर्स किचनमध्येच
१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ (अनारसे, करंजी, चकली, चिरोटे). नोंदणी आवश्यक
**मदर्स किचन**
फुलवाला चौक धुळे.
9049902201
7887750864



## विकणे आहे

**१) देवपूर आग्रारोड, हिम हॉटेलचेमागे, हॉस्पिटल किंवा अपार्टमेंट बनविणेसाठी उपयुक्त असा सिटीएस क्र.४९७५ क्षेत्रफळ ५४७५ चौरस फुटाचा प्लॉट.**

**२) गोंदुर विमानतळ रोड टच मौजे गोंदुर, गट नं.५५/३बी प्लॉट नं.१ क्षेत्रफळ ६७४० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.**

-: संपर्क :-
9420602255/9422285483


**झाडे लावा झाले जगवा**


## पाहिजेत

अनुभवी सेल्समन पाहिजेत पगार अनुभवाप्रमाणे देण्यात येईल.
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
अकबर चौक, गल्ली नं.२, धुळे
9422286958



## पाहिजेत

गरुड मैदान कॉम्प्लेक्स येथे सुरू होणाऱ्या नवीन रेडीमेड गारमेंट्स शोरूमसाठी जागा भरणे आहेत!
अनुभवी सेल्समन- ५ जागा
हेल्पर- २ जागा
अनुभवी व इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
-: संपर्क :-
+91 90493 50591



## पाहिजेत

लोकमान्य नर्सिंग इन्स्टीट्युट धुळे करीता
१) B. Sc. नर्सिंग शिक्षक/शिक्षिका : २ जागा
२) कॉम्प्युटर ऑपरेटर क्लार्क : २ जागा
-:संपर्क :-
9766574679



सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



## शंकर विजय सॉ मिल

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722



## पाहिजेत

कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहेत.
सेल्समन : २
हेल्पर : २
समक्ष येवून भेटा.
**बेबीज वर्ल्ड**
ग. नं. २, धुळे
त्रिविक्रम मंगल कार्यालय समोर, धुळे
9850835999



## पाहिजेत

होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8888096777



## REQUIRED

Required: Hospital Administrative Officer (Male/Female)
For a 50-bedded Hospital at Dhule.
Experience in Hospital Administration.
Degree/Diploma in Health Care Management. Preference to Doctor- BAMS/BHMS/BUMS/BEMS/DHMS/BDS candidates.
Contact: 9422961803



## पाहिजेत

रेडिमेड कपड्यांच्या दुकानासाठी
Sales man / Sales Girl
त्वरित पाहिजे.
आकर्षक पगार देण्यात येईल
-:संपर्क :-
**गौतम जैन**
पाच कंदिल, आग्रारोड, धुळे
8208392178



## पाहिजेत

दुकान कामासाठी सेल्समन व हेल्पर लावणे आहे.
जेन्टस व लेडीज
-: समक्ष भेटा :-
**शाह हॅन्डलुम**
नवग्रही गल्ली नं. २, पारोळा रोड, धुळे



## पाहिजेत

मेडिकल होलसेल दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजेत
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकाऊन्टेंट
२) सेल्समन बाहेर गांवसाठी
३) मदतनीस/हेल्पर
संपर्क :- संजय मेडिकल्स्
गल्ली नं.२, धुळे



## प्लॉट विकणे

3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331



## आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...

atomberg "Why not?"



**क्या आप जानते हैं**

इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं?

इंडक्शन मोटर वह मोटर है, जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.

एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इससे हर साल ₹1500 तक की बचत होती है.

इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.

ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.

इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है!

SAVES UP TO ₹1500 IN A YEAR

100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

District Distributor **श्री महावीर** इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०